# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर नाईट ज्युनि. कॉलेज यांचेमार्फत कामकरी वर्गातील गरीब व होतकरू
**{शिक्षण विभाग}** विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्या जाते. या विद्यार्थ्यांना शिकविण्याकरीता वर्गखोल्या भाडेतत्वावर नाममात्र दरात मनपातर्फे उपलब्ध करून द्यावयाचे असून, मनपा मालकीच्या चिंतेश्वर हिंदी उच्च प्राथ. शाळेतील ६ वर्गखोल्या प्रतिमाह २५० प्रती वर्गखोली याप्रमाणे खालील अटी व शर्ती अन्वये देणे संयुक्तिक राहील.

१) संस्थेस प्रती वर्गखोली प्रती माह रू.२५०/- या दराप्रमाणे वर्गखोली किरायाने देण्यात येईल.
२) संस्थेस प्रत्येकी ११ महिन्याचा भाडेकरार महानगरपालिके सोबत करावा लागेल. यासाठी पक्ष क्र. १ नागपूर महानगरपालिका तर्फे मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेल्या शिक्षणाधिकारी श्री. राजेन्द्र लहानुजी पुसेकर, शिक्षण विभाग, केंद्रीय कार्यालय, मनपा नागपूर आणि पक्ष क्र. २ दि-को-ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी नागपूर व्दारा संचालित नागपूर नाईट कनिष्ठ महाविद्यालय तर्फे सचिव श्री. मुकेश भिमरावजी घोळसे, रा. प्लॉट क्र. ४३६, ओमनगर, नागपूर
३) भाडेतत्वावर दिलेल्या कराराची मुदत प्रथमत: ११ महिन्याची असून, या कालावधीत महानगरपालिकेस स्वप्रयोजनार्थ इमारत वापरावयाची असल्यास, मनपाच्या/शासकीय प्रकल्पाकरीता जागा उपलब्ध करून द्यावयाची असल्यास विना अट, विना विलंब इमारत रिक्त करून द्यावी लागेल.
४) प्रथमता निश्चित केलेल्या ११ महिन्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर संसथेच्या कार्याच्या आधारे व मनपाच्या आवश्यकतेनुसार पुढील मुदतवाढ देता येवू शकेल.
५) संस्थेस त्यांचे वापरात असलेल्या विद्युत, पाणी व इतर लागू असलेल्या शासकीय करांचा भरणा स्वत: करावा लागेल.
६) करारनाम्यात नमूद सर्व अटी व शर्तीचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.
७) पक्ष क्र. २ वरील वर्गखोल्यांकरीता एकमुश्त वार्षिक वापरशुल्क रू. १८०००/- सदर करारनाम्याच्या दिनांकापासून ३ दिवसाच्या आंत म.न.पा. फंडात मागणी धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) किंवा रोखीने जमा करतील.
८) पक्ष क्र. २ ने एकमुश्त वार्षिक वापरशुल्क जमा केल्याच्या दिनांकापासून ३ दिवसाच्या आंत पक्ष क्र. १ चिंतेश्वर हिंदी उच्च प्राथ. शाळा गंगाजमना, नागपूर इमारतीतील ६ रिकामी वर्गखोल्या पक्ष क्र. २ ला हस्तांतरीत करतील.
९) पक्ष क्र. २ ला या वर्गखोल्या फक्त रात्रीपाळीच्या वर्ग चालविण्याकरीता देण्यात येत आहे. या व्यतिरिक्त इतर कुठल्याही प्रकारचा वापर किंवा कोणत्याही वेळेत वापर पक्ष क्र. २ ला करता येणार नाही.
१०) पक्ष क्र. २ त्यांना वापर करीता हस्तांतरीत मिळकतीची देखरेख करतील तसेच कोणत्याही बेजबाबदारीच्या वापरामुळे सदर मिकतीला नुकसान होणार नाही याची दक्षता घेतील. व असे न केल्यास कोणत्याही कारणाने मिळकतीला नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई करण्याची सर्वस्व जबाबदारी पक्ष क्र. २ ची राहील.
११) सदर मिळकतीला येणारे विज देयक व पाण्याचा देयक वर्गखोल्यांच्या समप्रमाणात पक्ष क्र. १ व २ ला करावा लागेल. दरमहिन्याच्या १० तारखेपर्यंत पक्ष क्र. २ ला देय असलेल्या विज देयक व पाण्याचा देयकाची रक्कम बाबत लेखी सुचना करतील. तसेच लेखी सुचना मिळाल्यापासून ३ दिवसाच्या आंत पक्ष क्र. १ ती रक्कम रोखीने महानगरपालिका फंडात जमा करतील. कसूर केल्यास पक्ष क्र. १ ला पुरविण्यात आलेला विज व पाणी १५ दिवसाची पूर्व सुचना देऊन खंडीत करण्यात येईल.

१२) दिलेल्या वर्गखोल्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल करण्याचे अधिकार पक्ष क्र. २ ला राहणार नाही. बदल करण्याची गरज असल्यास पक्ष क्र. १ ची पूर्व लेखी परवानगी घेणे पक्ष क्र. २ ला बंधनकारक राहील.

१३) कोणत्याही परिस्थितीत दिलेल्या ६ वर्गखोल्या व्यातिरिक्त इतर कोणतीही वर्गखोली व प्रांगण, फर्निचर व इतर वस्तु व साहित्य पक्ष क्र. १ च्या पूर्व लेखी परवानगीशिवाय पक्ष क्र. २ ला वापरता येणार नाही.

१४) पक्ष क्र. २ ला हस्तांतरीत मिळकतीचा कोणत्याही क्षणी निरीक्षण करण्याचे संपूर्ण अधिकार पक्ष क्र. १ ला राहणार व त्याकरीता पक्ष क्र. २ ला पूर्व सुचना देण्याची गरज राहणार नाही.

१५) हा करारनामा झाल्याच्या दिनांकापासून पुढील शैक्षणिक सत्र संपेपर्यंत अर्थात दि. ३० एप्रिल, २०२४ पर्यंत वैध राहणार व त्यानंतर दोन्ही पक्षांच्या सहमतीने पुढील ११-११ महिन्याच्या कालावधीकरीता नुतनीकरण करण्यात येईल.

१६) दरवर्षी मासिक भाडयात १०% दराने वाढ करण्याचा अधिकार पक्ष क्र. १ ला राहील.

सबब विद्यार्थ्यांकरीता चालविण्यात येणाऱ्या रात्र शाळेस विशेष बाब म्हणून रू. २५०/- प्रती माह वर्गखोली भाडे प्रती वर्गखोली प्रती माह या दराप्रमाणे ६ वर्गखोल्या उपरोक्त नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून किरायाने देण्यास्तव मान्यतेस्तव सादर प्रस्तुत.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 353/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 18/04/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर नाईट ज्युनि. कॉलेज यांचेमार्फत कामकरी वर्गातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्या जाते. या विद्यार्थ्यांना शिकविण्याकरीता वर्गखोल्या भाडेतत्वावर नाममात्र दरात मनपातर्फे उपलब्ध करून द्यावयाचे असून, मनपा मालकीच्या चिंतेश्वर हिंदी उच्च प्राथ. शाळेतील ६ वर्गखोल्या प्रतिमाह २५० प्रती वर्गखोली याप्रमाणे खालील अटी व शर्ती अन्वये देणे संयुक्तिक राहील.

१) संस्थेस प्रती वर्गखोली प्रती माह रू.२५०/- या दराप्रमाणे वर्गखोली किरायाने देण्यात येईल.

२) संस्थेस प्रत्येकी ११ महिन्याचा भाडेकरार महानगरपालिके सोबत करावा लागेल. यासाठी पक्ष क्र. १ नागपूर महानगरपालिका तर्फे मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेल्या शिक्षणाधिकारी श्री. राजेन्द्र लहानुजी पुसेकर, शिक्षण विभाग, केंद्रीय कार्यालय, मनपा नागपूर आणि पक्ष क्र. २ दि-को-ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी नागपूर व्दारा संचालित नागपूर नाईट कनिष्ठ महाविद्यालय तर्फे सचिव श्री. मुकेश भिमरावजी घोळसे, रा. प्लॉट क्र. ४३६, ओमनगर, नागपूर

३) भाडेतत्वावर दिलेल्या कराराची मुदत प्रथमत: ११ महिन्याची असून, या कालावधीत महानगरपालिकेस स्वप्रयोजनार्थ इमारत वापरावयाची असल्यास, मनपाच्या/शासकीय प्रकल्पाकरीता जागा उपलब्ध करून द्यावयाची असल्यास विना अट, विना विलंब इमारत रिक्त करून द्यावी लागेल.

४) प्रथमता निश्चित केलेल्या ११ महिन्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर संसथेच्या कार्याच्या आधारे व मनपाच्या आवश्यकतेनुसार पुढील मुदतवाढ देता येवू शकेल.

५) संस्थेस त्यांचे वापरात असलेल्या विद्युत, पाणी व इतर लागू असलेल्या शासकीय करांचा भरणा स्वत: करावा लागेल.

६) करारनाम्यात नमूद सर्व अटी व शर्तीचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

७) पक्ष क्र. २ वरील वर्गखोल्यांकरीता एकमुश्त वार्षिक वापरशुल्क रू. १८०००/- सदर करारनाम्याच्या दिनांकापासून ३ दिवसाच्या आंत म.न.पा. फंडात मागणी धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) किंवा रोखीने जमा करतील.

८) पक्ष क्र. २ ने एकमुश्त वार्षिक वापरशुल्क जमा केल्याच्या दिनांकापासून ३ दिवसाच्या आंत पक्ष क्र. १ चिंतेश्वर हिंदी उच्च प्राथ. शाळा गंगाजमना, नागपूर इमारतीतील ६ रिकामी वर्गखोल्या पक्ष क्र. २ ला हस्तांतरीत करतील.

९) पक्ष क्र. २ ला या वर्गखोल्या फक्त रात्रीपाळीच्या वर्ग चालविण्याकरीता देण्यात येत आहे. या व्यतिरिक्त इतर कुठल्याही प्रकारचा वापर किंवा कोणत्याही वेळेत वापर पक्ष क्र. २ ला करता येणार नाही.

१०) पक्ष क्र. २ त्यांना वापर करीता हस्तांतरीत मिळकतीची देखरेख करतील तसेच कोणत्याही बेजबाबदारीच्या वापरामुळे सदर मिकतीला नुकसान होणार नाही याची दक्षता घेतील. व असे न केल्यास कोणत्याही कारणाने मिळकतीला नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई करण्याची सर्वस्व जबाबदारी पक्ष क्र. २ ची राहील.

११) सदर मिळकतीला येणारे विज देयक व पाण्याचा देयक वर्गखोल्यांच्या समप्रमाणात पक्ष क्र. १ व २ ला करावा लागेल. दरमहिन्याच्या १० तारखेपर्यंत पक्ष क्र. २ ला देय असलेल्या विज देयक व पाण्याचा देयकाची रक्कम बाबत लेखी सुचना करतील. तसेच लेखी सुचना मिळाल्यापासून ३ दिवसाच्या आंत पक्ष क्र. १ ती रक्कम रोखीने महानगरपालिका फंडात जमा करतील. कसूर केल्यास पक्ष क्र. १ ला पुरविण्यात आलेला विज व पाणी १५ दिवसाची पूर्व सुचना देऊन खंडीत करण्यात येईल.

१२) दिलेल्या वर्गखोल्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल करण्याचे अधिकार पक्ष क्र. २ ला राहणार नाही. बदल करण्याची गरज असल्यास पक्ष क्र. १ ची पूर्व लेखी परवानगी घेणे पक्ष क्र. २ ला बंधनकारक राहील.

१३) कोणत्याही परिस्थितीत दिलेल्या ६ वर्गखोल्या व्यातिरिक्त इतर कोणतीही वर्गखोली व प्रांगण, फर्निचर व इतर वस्तु व साहित्य पक्ष क्र. १ च्या पूर्व लेखी परवानगीशिवाय पक्ष क्र. २ ला वापरता येणार नाही.

१४) पक्ष क्र. २ ला हस्तांतरीत मिळकतीचा कोणत्याही क्षणी निरीक्षण करण्याचे संपूर्ण अधिकार पक्ष क्र. १ ला राहणार व त्याकरीता पक्ष क्र. २ ला पूर्व सुचना देण्याची गरज राहणार नाही.

१५) हा करारनामा झाल्याच्या दिनांकापासून पुढील शैक्षणिक सत्र संपेपर्यंत अर्थात दि. ३० एप्रिल, २०२४ पर्यंत वैध राहणार व त्यानंतर दोन्ही पक्षांच्या सहमतीने पुढील ११-११ महिन्याच्या कालावधीकरीता नुतनीकरण करण्यात येईल.

१६) दरवर्षी मासिक भाडयात १०% दराने वाढ करण्याचा अधिकार पक्ष क्र. १ ला राहील.

सबब विद्यार्थ्यांकरीता चालविण्यात येणाऱ्या रात्र शाळेस विशेष बाब म्हणून रू. २५०/- प्रती माह वर्गखोली भाडे प्रती वर्गखोली प्रती माह या दराप्रमाणे ६ वर्गखोल्या उपरोक्त नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून किरायाने देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**